**<u>वादींतर्फे साक्षीदार क्र.१ ची सरतपासणी शपथेवर पुन्हा सुरु</u> -**

**१२.** मी, भालचंद्र सोमकांत पारकर, वय ४४ वर्षे, धंदा - शेती, रा. नेरुर, पारकरवाडी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, सत्यप्रतिज्ञेवर सांगतो की, सदरचे पुरावा प्रतिज्ञापत्र मी दाखल केलेले आहे. त्यातील मजकूर माझे सांगणेप्रमाणेच लिहीलेला आहे. तो खरा व बरोबर आहे. त्यासाठी मी त्यावर सही केलेली आहे.

**१३.** वादीने दाखल केलेले दस्तऐवज सार्वजनिक दस्तऐवज असल्याने त्या सर्व दस्तऐवजांना पूर्वीच निशाणी देण्यात आलेल्या आहेत.

(*प्रतिवादीच्या वकीलांच्या विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब*)

**समक्ष -**

सही/-
**(कोमलसिंग राजपूत)**
**दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

**कुडाळ**
**दिनांक : २० /०६/२०१७**

वा.दा.ब.अ.क.केले.

सही/-
**(कोमलसिंग राजपूत)**
**दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

**कुडाळ**
**दिनांक : २० /०६/२०१७**

**<u>साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु</u>** -

**<u>प्रतिवादी तर्फे श्री. ए. एस्. सामंत, वकील</u>** -

**१४.** हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत प्रतिवादीचे सासरे मयत विष्णू कृष्णा पारकर यांनी स्वतंत्रपणे मिळविलेली मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्या मृत्यूनंतर त्या मिळकतीला प्रतिवादीचे पती चंद्रकांत विष्णू पारकर याचे नांव लागलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, चंद्रकांत विष्णू पारकर यांनी मिळकतीची विक्रीची संपूर्ण किंमत अदा केल्याने दि. १८/०१/१९८० रोजी त्यांना कूळ कायदा कलम ३२-म नुसार विक्रीचा दाखला सुध्दा मिळालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, चंद्रकांत विष्णू पारकर याचे मृत्यूनंतर संपूर्ण दावा मिळकतीला प्रतिवादी व तिच्या इतर सहहिस्सेदारांची नांवे लागलेली आहेत. दि. ०३/०७/१९९३ रोजी प्रतिवादीच्या मुलाने दिलेल्या अर्जानुसार दि. २२/०९/१९९३ रोजी प्रतिवादीने दिलेल्या हमीपत्राच्या आधारे ग्रामपंचायत नेरुर यांनी दि. २९/१०/१९९३ रोजी प्रतिवादीला घर बांधायची परवानगी दिली होती, याची माहिती मला नाही. त्यानुसार प्रतिवादीने सर्व्हे नंबर ५७/९ म्हणजेच दावा मिळकतीवर त्यावेळी लोड बिअरींगच्या घराचे बांधकाम केलेले आहे.

**१५.** त्या घराचा स्लॅब जीर्ण होवून झिरपत होता, याची माहिती मला नाही. त्यामुळे प्रतिवादीने दि. २१/०२/२०१५ रोजी त्या घराच्या दुरुस्तीसाठी ग्रामपंचायतीकडे परवानगी मागितली होती, याची माहिती मला नाही. त्यानुसार प्रतिवादीला घर नंबर १७५२ प्रमाणेच घर बांधणेकरीता दि. ०४/०३/२०१५ रोजी परवानगी दिली होती, याची माहिती मला नाही. त्यानंतर पावसाळा सुरु झाल्याने प्रतिवादीने नोव्हेंबर २०१५ मध्ये ग्रामपंचायतीने दिलेल्या परवानगीस अधीन राहून बांधकाम सुरु केले, याची माहिती मला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने पूर्वी असलेले घरच पक्क्या स्वरुपात बांधलेले आहे. प्रतिवादी सध्या त्याच नविन बांधलेल्या घरात राहत आहे.

**१६.** प्रतिवादी डिसेंबर २०१५ ते दि. १५ फेब्रुवारी २०१६ या कालावधीत मुंबई येथे वास्तव्यास होती, याची माहिती मला नाही. दावा दाखल करण्यास नमूद केलेले कारण म्हणून जी घटना नमूद केलेली आहे, ती घटना कधी घडली आहे किंवा नाही, याची माहिती मला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी चूकीचे पुरावा प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करण्यास आता कोणतेही कारण उरलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी चूकीचा दावा दाखल करुन चूकीची साक्ष देत आहे.

**<u>फेरतपास</u>** - नाही.

**समक्ष** -

सही/-
**(कोमलसिंग राजपूत)**
**दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

**कुडाळ**
**दिनांक : ०७ /०६/२०१८**

वा.दा.ब.अ.क.केले.

सही/-
**(कोमलसिंग राजपूत)**
**दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

**कुडाळ**
**दिनांक : ०७ /०६/२०१८**